


# टिळक महाराष्ट्र विद्यापीठात ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ परीक्षण स्पर्धा

**पुणे :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथालयात असलेल्या एक लाखापेक्षा अधिक ग्रंथ संपदेतून भारताचे स्वातंत्र सेनानी या विषयाशी निगडित पुस्तकांचे प्रदर्शन व ग्रंथ परीक्षण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १० ते १६ ऑगस्टपर्यंत प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. प्रदर्शनात १९०९ पासून ते आतापर्यंतची पुस्तके मांडण्यात आली आहेत. या प्रदर्शनाद्वारे ग्रंथालयातील दुर्मीळ पुस्तकांना वाचकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रंथ परीक्षणामध्ये वाचकांनी ग्रंथाचा तपशिलाबरोबर त्यांना



ग्रंथामध्ये आवडलेले एक वाक्य नमूद करायचे आहे. स्पर्धेमध्ये जिंकणाऱ्या वाचकांचे नावे १५ ऑक्टोबर रोजी वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्याने घोषित करण्यात येणार आहेत.